<u>साक्षीदाराचा पुढील उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांच्यामार्फत शपथेवर सुरु–</u>

०६. जप्त मुद्देमालाचे पार्सल माझ्या ताब्यात देण्यात आले होते त्यावेळी मला त्यामध्ये बंदूक असल्याचे सांगण्यात आले होते. मी मुंबई प्रयोगशाळेमध्ये माझ्या ताब्यातील मुद्देमाल हा खोलून त्यातील बंदूक त्यांना दाखवून त्यांच्या ताब्यात तपासणीकरीता दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रयोगशाळेतर्फे मला देण्यात आलेल्या पोहोच वरती त्यांना तपासणीकरीता बंदूक प्राप्त झाली असे कोठेही नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रयोगशाळेमध्ये पोलीस खात्यामार्फत अनेक प्रकारच्या वस्तू या तपासणीकरीता पाठविल्या जातात. मी प्रयोगशाळेमध्ये संबंधीत कर्मचारी यांना त्यांना तपासणीकरीता बंदूक प्राप्त झाली अशी स्पष्ट पोहोच देण्याबाबतची विनंती केली नाही. निशाणी ३० कडील कागदाची मूळप्रत ही प्रयोगशाळमध्ये जमा करण्यात आली. माझ्या म्हणण्याप्रमाणे निशाणी ३० कडील प्रत ही स्थळप्रत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रयोगशाळेमध्ये एखादा मुद्देमाल जमा केल्यानंतर त्याबाबतची मिळालेली पोहोच पावतीची नोंद ही आमच्या पोलीस स्टेशनमधील आवक रजिस्टरमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३० कडील स्थळप्रतीवर पोलीस स्टेशनचा कोणताही आवक क्रमांक नमूद नाही. निशाणी ३० कडील स्थळप्रतीची मूळप्रत ही प्रयोगशाळेमध्ये जमा करण्याकरीता घेवून जाण्यापुर्वी त्याची नोंद आमच्या पोलीस ठाण्यामधील जावक नोंदवहीमध्ये घेतली होती.

०७. निशाणी ३१ कडील कागद हा दि. १४/०१/२०१९ रोजी माझ्या ताब्यामध्ये देण्यात आला होता. मी निशाणी ३१ कडील कागद हा दि. १८/०१/२०१९ रोजी प्रयोगशाळेमध्ये जमा केला. हे म्हणणे खरे आहे की, तपासणी केलेला मुद्देमाल व तपासणी अहवाल हा माझ्या ताब्यामध्ये देण्यात आला असा कोणताही उल्लेख निशाणी ३१ कडील कागदामध्ये नाही. मी निशाणी ३१ कडील कागदामध्ये तपासणी केलेला मुद्देमाल व अहवाल हा माझ्या ताब्यामध्ये देण्यात आला याची नोंद करण्याबाबत विनंती प्रयोगशाळेमधील संबंधीत कर्मचारी यांच्याकडे केली नाही. प्रयोगशाळेने माझ्या मार्फत मुद्देमाल व अहवाल पाठवित असलेबाबत कोणताही स्वतंत्र पत्र व्यवहार पोलीस ठाण्याशी केलेला नव्हता. प्रयोगशाळेमध्ये

घेवून आलेला मुद्देमाल व अहवाल हा माझ्यामार्फत पोलीस स्टेशनला जमा करण्यात आला अशा आशयाची नोंद आमच्या पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्यात आलेली नाही. प्रयोगशाळेतील जमा केलेला मुद्देमाल व पुन्हा प्रयोगशाळेमधून आणलेला मुद्देमाल तसेच अहवाल या संदर्भाने माझे तपास टिपण नोंदवितेवेळी मी प्रयोगशाळेमधून अहवाल प्राप्त करुन तो पोलीस स्टेशनमध्ये जमा केला होता ही गोष्ट संबंधीत अधिकारी यांना सांगितली होती.

प्रश्न– माझे तपास टिपण नोंदवितेवेळी मी प्रयोगशाळेमधून अहवाल प्राप्त करुन तो पोलीस स्टेशनमध्ये जमा केला होता ही गोष्ट माझ्या तपास टिपणामध्ये नमूद नाही ?
उत्तर – माझे तपास टिपणामध्ये मी अहवाल पोलीस स्टेशनमध्ये जमा केला होता ही गोष्ट नमूद आहे.

०८. हे म्हणणे खरे नाही की माझ्या मार्फत मुद्देमाल हा प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात आला व सदरचा मुद्देमाल तसेच त्याबाबतचा अहवाल प्राप्त करुन मी पोलीस स्टेशनमध्ये जमा केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरोधात केलेले सर्व कथन हे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीस खात्यात असल्यामुळे सहकाऱ्यांना मदत करण्याकरीता आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/-

दिनांक– १९/११/२०२५

(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.